**GALLERY**

**PRESS RELEASE**



Daily महाराष्ट्र स्पोर्ट्स
maharashtra.sports22@gmail.com

# पुणे जिल्हा रोप स्किपिंग स्पर्धेत कुकडी व्हॅली स्कूलचे घवघवीत यश

**पुणे :** पुणे जिल्हा रोप स्किपिंग असोसिएशन तसेच राजगड ज्ञानपीठाचे अनंत निर्मल ग्लोबल स्कूल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय रोप स्किपिंग अजिंक्यपद स्पर्धेत वेडगावच्या कुकडी व्हॅली पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी नोंदवत घवघवीत यश संपादन केले.

या स्पर्धेचे उद्घाटन युवा नेते पृथ्वीराज थोपटे, पुणे जिल्हा रोप स्किपिंग संघटनेचे अध्यक्ष कृष्णा तांबे, स चिव रामा रंधीवे, ज्ञानेश्वर जाधव, ऋषिकेश वालझाडे यांनी केले. या स्पर्धेत एकूण २०० खेळाडू सहभागी झाले होते.

या स्पर्धेत वेडगावच्या कुकडी व्हॅली पब्लिक स्कूलच्या संघाने द्वितीय क्रमांक संपादन केला. या स्पर्धेत ईशानी खानेकर (सुवर्ण), तनिष्का असवरे (कांस्य), आर्या नेहरकर (सुवर्ण), दूर्वा कोकणे (कांस्य), सिद्धी राकेचा (रौप्य), अद्विता ढमाले (सुवर्ण), आर्या शिंदे (कांस्य), अमृता आवटे (कांस्य), साई दांगट (सुवर्ण), समीक्षा ढमाले (सुवर्ण), अरहान मोमिन (कांस्य), सर्वेश पोखरकर (रौप्य) या खेळाडूंनी पदक जिंकत आपला ठसा उमटवला. या पदक विजेत्या खेळाडूंना प्रशिक्षक ऋषिकेश वालझाडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या कामगिरीबद्दल कुकडी परिवारातर्फे तसेच पुणे जिल्हा रोप स्किपिंग संघटनेतर्फे अभिनंदन करण्यात आले. शाळेचे प्राचार्य, विष्णू थोरवे, रामा रंधिवे यांनी खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक केले.




# 'राजगड ज्ञानपीठ'च्या शिरपेचात मानाचा तुरा

## राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत १० सुवर्णपदके पटकावली

भोर, दि. २८ (प्रतिनिधी) - राजगड ज्ञानपीठाचे अनंत निर्मल ग्लोबल स्कूल धांगवडीच्या विद्यार्थ्यांनी सिद्धि विनायक फायटर्स अकादमी निगडी, पुणे आयोजित पहिल्या राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत सहभाग घेतला होता आणि यामध्ये स्कूलला द्वितीय क्रमांक मिळाला असून, विद्यार्थी १० सुवर्णपदके, १४ रौप्य आणि १० कांस्य पदकांचे मानकरी ठरले आहेत.

सर्व विजेत्यांचे राजगड ज्ञानपीठचे संस्थापक अध्यक्ष आणि मजी मंत्री अनंतराव थोपटे, कार्याध्यक्ष आमदार संग्राम थोपटे, मानद सचिव स्वरूपा थोपटे यांनी विशेष कौतुक केले असुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना कॅम्पसचे इस्टेट मॅनेजर राहुल खामकर, स्कुलच्या प्राचार्या सबीहा शेख यांनी मार्गदर्शन केले, तर किरण साळेकर आणि इतर स्टाफने मुलांचा सराव करून घेतला होता.

### पदकांचे मानकरी विद्यार्थी

इयत्ता पहिली - श्रीन्मई सराफ (सुवर्ण), श्रवण जगताप (रौप्य), अधिराज जगताप (रौप्य), समीर जाधव (रौप्य), आयुष वीर (रौप्य), संग्राम कांबळे (रौप्य), ओवी भालघरे (रौप्य), प्रतीक्षा राजपुरोहित (रौप्य), मनस्वी जाधव (रौप्य).

इयत्ता दुसरी - दिग्विजय सोनवणे (रौप्य), शरण पालिएडाथ (रौप्य), ५. राजवर्धन निगडे (रौप्य), अर्णव बंड (कांस्य), रोहित संघशेट्टी (कांस्य).

इयत्ता तिसरी - साई कर्डिले (सुवर्ण), साई थिटे (सुवर्ण), विहान सोंडकर (सुवर्ण), ओवी लाले (रौप्य), शिवम निगडे. (कांस्य), निरंजन पाटील (कांस्य), विहान भोसले (कांस्य), श्रीधर बांदल (कांस्य), अन्वी इंगळे (कांस्य).

इयत्ता चौथी - श्रुती खिलारे (सुवर्ण), समर्थ रांजणे (सुवर्ण), ईश्वरी शेटे (रौप्य), आरोही कुडले (रौप्य), अनुज निगडे. (कांस्य), अस्मिता जाधव (कांस्य).

इयत्ता पाचवी - २. जान्हवी शिरगावकर (सुवर्ण), वैष्णवी पांचाळ (सुवर्ण), मनस्विनी सोनवणे (रौप्य), सत्यजित शेडगे (रौप्य), आसावरी सोनवणे (रौप्य).



**पुणे :** येथे राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत धांगवडीचे विद्यार्थी.

# अनंत निर्मल ग्लोबल स्कूलचे 'तायक्वांदो'त यश



धांगवडी (ता. भोर) : येथील अनंत निर्मल ग्लोबल स्कूलचे तायक्वांदो स्पर्धेतील विजेते विद्यार्थी.

भोर, दि. ३१ (प्रतिनिधी) - राजगड ज्ञानपीठ संचलित अनंत निर्मल ग्लोबल स्कूल, धांगवडी (ता. भोर) येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवर कोलकाता येथे तायक्वांदो स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन सुवर्ण पदकासह दोन रौप्य पदके मिळवून विद्यालयाचे सावर्लौकिकात मानाचा तुरा रोवला आहे.

या स्पर्धेत ईश्वरी सचिन शेटे हिने सुवर्णपदक, तर सत्यजित महेंद्र शेडगे आणि श्रुती सागर खिलारे यांनी रौप्य पदक मिळवले असून, सर्व विजेत्यांचा संयोजकांतर्फे गौरव करण्यात आला. राजगड ज्ञानपीठाचे संस्थापक अध्यक्ष, तथा माजी मंत्री अनंतराव थोपटे, कार्याध्यक्ष आमदार संग्राम थोपटे आणि संस्थेच्या मानद सचिव स्वरूपा थोपटे यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले आहे. निगडी, पुणे येथे गतवेळी झालेल्या राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेमध्ये अनंत निर्मल ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी १० सुवर्ण पदके, १४ रौप्य पदके, १० कांस्य पदके पटकावली होती. भविष्य काळातही दर्जेदार शिक्षण, विविध स्पर्धा, विविध उपक्रम, मुलांना शिक्षणामध्ये सर्व गुणसंपन्न करण्याचा मानस असल्याचे संस्थेच्या मानद सचिव स्वरूपा थोपटे यांनी व्यक्त केला आहे. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना राहुल खामकर, प्राचार्य सविता शेख यांनी मार्गदर्शन केले. स्पोर्टस शिक्षक किरण साळेकर यांनी विद्यार्थ्यांचा सराव करून घेतला होता.

